## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**
१) या कार्यालयाचे आदेश क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०११/जा.९७९, दि.०२/१२/२०११.
२) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रिमिनल रिट पिटीशन क्र. ४०९०/२०१२ मधील दिनांक २८/०२/२०१२ रोजी पारीत केलेले आदेश.
३) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रिमिनल ॲप्लिकेशन क्र. २०८/२०१२ मधील दिनांक २३/०४/२०१२ रोजी पारीत केलेले आदेश.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०११/जा. २९८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०..
दिनांक : ०८ /०५/२०१२.

### आदेश शुध्दीपत्र

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

या कार्यालयाचे वाचावे क्र.१ अन्वये पारित केलेल्या आदेशातील आदेश क्र. ५ मध्ये, " प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण एकूण ५०,००० लिटर डिझेलचा साठा शासनजमा करण्यात येत असून, सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी " असे नमूद केलेले आहे.

तद्नंतर टँकर बार्ज टिना नं. ३ चे तसेच शायनी शिपींग कॉर्पोरेशन प्रा.लि.चे मालक, स्टॅनी उर्फ स्टॅनली लिओ नऱ्होना यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या क्रिमिनल रिट पिटीशन क्र. ४०९०/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदरचे रिट पिटीशन फेटाळून वाचावे क्र. २ अन्वये, टँकर बार्ज टिना नं. ३ मधील ५०,००० लिटर डिझेलचा साठा हा पोलिसांनी मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याबाबत आदेश पारीत करुन या कार्यालयाचे वाचावे क्र. १ अन्वये यापूर्वी पारीत केलेले आदेश कायम केले आहेत.

तथापी, मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या क्रिमिनल ॲप्लिकेशन क्र. २०८/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी या कार्यालयाचे वाचावे क्र. १ अन्वये पारीत केलेले आदेश कायम करुन त्यात अंशत: फेरबदल करुन टँकर बार्ज टिना नं. ३ मधील ५०,००० लिटर डिझेलचा साठा हा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत त्यांच्या धोरणानुसार कोणत्याही तेल कंपनीस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याबाबत वाचावे क्र. ३ अन्वये आदेश पारीत केले आहेत.

0002

सबब, या कार्यालयाचे वाचावे क्र.१ अन्वये पारित केलेल्या आदेशातील आदेश क्र. ५ मध्ये या शुध्दीपत्रकानुसार सुधारणा करण्यात येत असून त्यामध्ये, " प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण एकूण ५०,००० लिटर डिझेलचा साठा शासनजमा करण्यात येत असून, सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांना विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी " असे वाचावे.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) वासुदेव कुसाजी धुरी (बार्जचा चालक)
२) रंगीला प्रसाद शंभू राय (सेंकड मास्टर)
३) सुशांत किशोरी मन्ना (मास्टर)
४) टँकर बार्ज टिना नं. ३ चे तसेच शायनी शिपींग कॉर्पोरेशन प्रा.लि.चे मालक, स्टॅनी उर्फ स्टॅनली लिओ नऱ्होना

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
३) टर्मिनल मॅनेजर, मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., शिवडी १ टर्मीनल, शिवडी रेल्वे स्टेशन समोर, शिवडी(पूर्व), मुंबई -१५ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४) चिफ मरीन मॅनेजर, पश्चिम विभाग, २५४-सी, डॉ. ॲनी बेसेंट रोड, वरळी कॉलनी, मुंबई-३० यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI 312

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc